# मुंबई विद्यापीठ

क्र.का.प्रा.वि./ आयसीडी/२०२४-२५/१५४

व्यवस्थापन परिषद

**मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२४-२५ मधील नववी सभा मंगळवार दिनांक १२ सप्टेंबर, २०२४ तसेच सौर दिनदर्शिकेनुसार २१ भाद्र, शके १९४६ रोजी दुपारी १२:०० वाजता सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२ येथे आयोजित करण्यात आली होती.

बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :-

| अनु. क्र. | माननीय सदस्यांचे नाव | पदनाम | उपस्थिती/ अनुपस्थिती |
|---|---|---|---|
| १ | प्रा. रविंद्र कुलकर्णी ( कुलगुरु) | अध्यक्ष | उपस्थित |
| २ | प्रा. अजय भामरे (प्र-कुलगुरू) | सदस्य | उपस्थित |
| ३ | डॉ. शेषाद्री चारी | सदस्य | उपस्थित |
| ४ | डॉ. अनिल कुमार सिंग (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ५ | डॉ. कविता लघाटे (प्रभारी अधिष्ठाता) | सदस्य | उपस्थित |
| ६ | डॉ. शिवराम गर्जे | सदस्य | उपस्थित |
| ७ | श्री. संदीप सिंग | सदस्य | उपस्थित |
| ८ | सचिव, उच्च व शिक्षण विभाग | सदस्य | अनुपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण संचालनालय | सदस्य | उपस्थित |
| १० | संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय | सदस्य | उपस्थित |
| ११ | डॉ. प्रसाद कारंडे (कुलसचिव) | सदस्य सचिव | उपस्थित |
| १२ | (सी.ए.) हर्षल वाघ (वित्त व लेखा अधिकारी ) | निमंत्रित | उपस्थित |
| १३ | डॉ. पूजा रौंदळे (संचालक, प.व.मु.मं.) | निमंत्रित | उपस्थित |

**स्वागत** : डॉ. कविता लघाटे यांनी नव नियुक्त मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव यांचे स्वागत करण्याची विनंती मा. कुलगुरू याना केली. मा. कुलगुरू यांनी पुस्तक देऊन डॉ. प्रसाद कारंडे यांचे स्वागत केले. व त्यांच्या पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

**श्रद्धांजली**

**दिनकर शिंदे**

प्रसिध्द गायक प्रल्हाद शिंदे यांचे यांचे पुत्र व गायक दिनकर प्रल्हाद शिंदे यांचे दिनांक १३ ऑगस्ट,२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५८ वर्षांचे होते.

**डॉ. शंतनू अभ्यंकर**

प्रसिध्द स्त्रीरोग तज्ज्ञ, लेखक आणि नास्तिकतावादी चळवळीचे बिनीचे शिलेदार डॉ. शंतनू अभ्यंकर यांचे दिनांक १५ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रदीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६० वर्षांचे होते.

**जनरल सुंदरराजन पद्मनाभन**

माजी लष्करप्रमुख जनरल सुदंरराजन पद्यमनाभन यांचे दिनांक १९ ऑगस्ट,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८३ वर्षांचे होते.

**डॉ. वि. म. वैद्य**

मराठी विज्ञान परिषदेचे माजी कार्यवाह डॉ. वि. म. वैद्य यांचे दिनांक २१ ऑगस्ट, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

**अनंत केमकर**

ज्येष्ठ संगीतकार आणि हार्मोनियम वादक सूरमणी अनंत केमकर यांचे दिनांक २५ ऑगस्ट,२०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

**सदानंद गाडगीळ**

नाटय, चित्रपट समीक्षक, पत्रकार प्राचार्य सदानंद गाडगीळ यांचे दिनांक २५ ऑगस्ट, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते.

**सुहासिनी देशपांडे**

ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचे २७ ऑगस्ट, २०२४ रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८१ वर्षांच्या होत्या.

**पं. शेखर खांबेटे**

ज्येष्ठ तबलावादक पं. शेखर खांबेटे यांचे दिनांक २८ ऑगस्ट, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७१ वर्षांचे होते.

**अब्दुल गफूर नुरानी**

सर्वोच्च न्यायालयाचे वकील, अभ्यासक आणि राजकीय भाष्यकार अब्दुल गफूर नुरानी यांचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी ते ९३ वर्षांचे होते.

**अविनाश सारंग**

भारताचे माजी अव्वल जलतरणपटू अविनाश सारंग यांचे दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते.

**प्रा. विजय तापस**

मराठीतील ज्येष्ठ नाटय आणि साहित्य समीक्षक, अभ्यासक आणि संषोधक प्रा. विजय तापस यांचे दिनांक ०१ सप्टेंबर, २०२४ दीर्घ आजाराने निधन झाले.

**अरूणा वासुदेव**

ख्यातनाम चित्रपट समीक्षक आणि लेखिका अरूणा वासुदेव यांचे दिनांक ५ सप्टेंबर, २०२४ रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८८ वर्षांच्या होत्या.

**सीताराम साळवी**

लालबागमधील ज्येष्ठ शिवसैनिक सीताराम साळवी यांचे दिनांक ६ सप्टेंबर, २०२४ हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी ते ८९ वर्षांचे होते.

माननीय सर्व सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली वाहिली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| १ | दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | दिनांक १४ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करण्यात आले. | |
| २ | व्यवस्थापन परिषद दिनांक २८ जून २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषद दिनांक दिनांक २८ जून २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचे कार्यवाही अहवाल व्यवस्थापन परिषदेत मान्य करण्यात आले. | |
| ३ | न्याय सहायक विज्ञान संस्थेत प्रवेशित सन २०१७-२०१८, २०१८-२०१९ व २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी ऑनलाईन नोंदणी पद्धतीने जमा करण्यास झालेल्या विलंबामुळे Provisional Eligible असलेल्या विद्यार्थ्यांचे Eligible शेरा करणेबाबत. | AEM |
| ठराव | न्याय सहायक विज्ञान संस्थेने विलंब झालेल्या चुकांबाबत संबंधितांवर काय कारवाई केली याबाबत तात्काळ दोन दिवसात खुलासा सादर करावा, सदर खुलासा पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावा तसेच सदर ठराव आजच्या बैठकीत मान्य करण्यात आला. योग्य ती प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी आणि संबंधित निकाल व गुणपत्रिका देण्यात यावे. | |
| ४ | Item for seeking approval of the Management Council to the names of three members committee constituted by the Hon'ble Vice-Chancellor in the matter of PIL filed Farokh S. Todyawalla. | Legal Cell |
| ठराव | उपरोक्त बाबतीत निर्णय घेण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली. सदर समिती अहवाल मा. कुलगुरूकडे सादर करतील, असे ठरले.<br>१) प्रा. प्रकाश मसराम (सेंटर फॉर एक्स्ट्रा मुरल स्टडीज)-अध्यक्ष<br>२) प्रा. मंजिरी कामत (डिपार्टमेंट ऑफ हिस्ट्री) -सदस्य.<br>३) डॉ. प्राची मोघे (सेंटर फॉर एक्स्ट्रा मुरल स्टडीज)-सदस्य. | |
| ५ | पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. आंबेडकर वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, वडाळा येथील डॉ. यशोधरा वराळे प्रभारी प्राचार्य यांनी केलेल्या विनंतीनुसार डॉ. आंबेडकर विधी महाविद्यालय, वडाळा येथे महाविद्यालयांतील विद्यार्थी व कर्मचारी | महाविद्यालयीन शिक्षक, मान्यता कक्ष |

| | | |
|---|---|---|
| | यांचे हित लक्षात घेऊन शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्ती वेतन अदा करणे तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांशी संबंधित महत्वाचे दैनंदिन कामकाज करण्याकरिता सेवा जेष्ठतेनुसार प्रभारी प्राचार्य पदासाठी प्राधिकाराबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ व योग्य तो निर्णय घेण्याकरिता सादर करण्यात येत आहे. | |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेत याबाबत असा निर्णय घेण्यात आला की डॉ. यशोधरा वराळे प्रभारी प्राचार्य यांनी केलेल्या विनंतीनुसार व सेवा जेष्ठतेनुसार प्रभारी प्राचार्य पदासाठी संबंधित विभागाने यादी तपासून पुढील नाव मा. कुलगुरू कडे मान्यतेसाठी सादर करावे. | |
| ६ | विद्यापरिषदेच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या सभेमध्ये बाब क्रमांक 8.2(A), 8.3(A), 8.4(N), 8.6(N), 8.7(N) वर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर. | AAMS |
| ठराव | विद्यापरिषदेच्या दिनांक १२ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या सभे मधील खालील बाबी मंजूर करण्यात आल्या.<br>**Faculty of Humanities**<br>1) **8.2 (A)** - amendment of O.IMP-5A, O.IMP-5B, O.IMP-5C relating title of the course M.A. (Journalism and Mass Communication) to M.A. (Communication and Journalism)<br>2) **8.3 (A)** - amendment of O.IMP-27A, O.IMP-27B, O.IMP-27C relating to title of the course M.A. (Journalism and Mass Communication- Strategic & Integrated Communication) to M.A. (Public Relation )<br>3) **8.4 (N)** - to introduce Ph.D. in Hindu Studies<br>4) **8.6 (N)** - to introduce New Programme B. Sc. (Honours) in Artifical Intelligence and Sport Analytics / B.Sc. (Honours with Research) in Artifical Intelligence and Sport Analytics Sem I & II<br>5) **8.7 (N)** - to introduce New Programme B. Sc. (Honours) in Data Science and Sports Studies / B.Sc. (Honours with Research) in Data Science and Sports Studies Sem I & II. | |
| ७ | मुंबई विद्यापीठ परिसरातील विविध विभागामधील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राजकीय संघटना यांच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे प्रशासकीय व शैक्षणिक कामकाजामध्ये वारंवार निर्माण होणारे अडथळे व विद्यापीठ प्रशासनाची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय विद्यापीठ परिसरात वारंवार होणाऱ्या सभा, बैठका, आंदोलने, उपोषण, निदर्शने व तत्सम कार्यक्रम आयोजित करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करण्याकरिता ठोस उपाय योजना करण्याबाबत विचारार्थ सविनय सादर. | VDMC |

| | | |
|---|---|---|
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की सुरक्षा विभागाने तात्काळ परिपत्रक निर्गमित करण्यात यावे की मुंबई विद्यापीठाच्या पूर्व परवानगी शिवाय विद्यापीठाच्या सर्व परिसरात यापुढे कोणत्याही संघटनेस किंवा व्यक्तीस, कोणत्याही स्वरूपाच्या सभा, आंदोलने, मोर्चा, उपोषण, निषेध मोर्चा, बैठका व तत्सम कोणताही कार्यक्रम आयोजित केल्यास विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.<br>परिपत्रकाप्रमाणे नियमांचे पालन होत आहे किंवा नाही याची सर्वस्वी जबाबदारी सुरक्षा विभागाची असेल. विद्यार्थ्यांच्या तक्रारीचा निपटारा होण्यासाठी कामे करण्याची आदर्श पद्धती (Standard Operating Procedure) सादर करावी. आणि सदर प्राप्त तक्रारीचा व निपटारा केलेल्या तक्रारीचा डेटा संग्रहित करावा. यासाठी डॉ. अनिल कुमार सिंग व श्री संदीप सिंग यांची एक समिती गठीत करण्यात आली. सदर समिती पुढील व्यवस्थापन परिषदेत आपला अहवाल सादर करतील. | |
| ८ | विद्यापीठाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रँकिंग उंचावणे तसेच विद्यापीठ स्तरावरील संशोधन उंचावण्याच्या दृष्टीने University Department Ranking Framework व Research Award देण्यासाठी RDC चे BOD ने recommend केलेला प्रस्ताव | AAMS |
| ठराव | विद्यापीठाचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय रँकिंग उंचावणे तसेच विद्यापीठ स्तरावरील संशोधन उंचावण्याच्या दृष्टीने University Department Ranking Framework व Best Research Publication Award and Best Research Funding and Innovation Award देण्यासाठी RDC चे BOD ने recommend केलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला. तसेच खालील मुद्दे समाविष्ट करण्यात यावे असे ठरले.<br>१) संबंधित विभागास प्रोत्साहन देण्यासाठी रक्कम कशा प्रकारे खर्च करावेत याबाबती वित्त व लेखा विभागाने मार्गदर्शक तत्वे तयार करावीत. | |
| ९ | प्रशासकीय सेवेत तत्परता आणण्यासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठ स्तरावरील विद्यापीठ प्रशासकीय विभाग यांना स्पर्धात्मक पारितोषक योजणे संबंधातपरिपत्रक निर्गमित करण्यासाठी निकष विचारार्थ सादर. | कुलसचिवांचे कार्यालय |
| ठराव | प्रशासकीय सेवेत तत्परता आणण्यासाठी सर्व आधिकारी आणि कर्मचारी यांना प्रोत्साहन देण्यासाठी गठीत समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला. तसेच खालील मुद्दे समाविष्ट करण्यात यावे असे ठरले.<br>१) संबंधित विभागास प्रोत्साहन देण्यासाठी दहा हजार रुपये कशा प्रकारे खर्च करावेत याबाबतीत वित्त व लेखा विभागाने मार्गदर्शक तत्वे तयार करावीत.<br>२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, एकरूप परिनियम, विद्यापीठ अनुदान आयोगाचे सारसंग्रह (Compendium), व शिखर संस्था (Apex Body) यांचे निर्देश/ नियम यांचा विभागाच्या कामामध्ये समावेश/ दाखवलेली तत्परता यांचा नियमामध्ये समावेश करण्यात यावा. | |

| | | |
|---|---|---|
| १० | मुंबई विद्यापीठात विद्यानगरी परिसरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून व अनधिकृत वाहतुकीवर नियंत्रण आणण्याकरिता तीनही गेटवर बूम बॅरियर यंत्रणा बसविण्यासाठी व त्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारची महा इ-टेंडर वेबसाईट, मराठी व इंग्रजी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देण्यासाठी मान्यता मिळणे बाबत विचारार्थ सविनय सादर. | VDMC / VAD |
| ठराव | मुंबई विद्यापीठात विद्यानगरी परिसरात सुरक्षेच्या दृष्टीकोनातून व अनधिकृत वाहतुकीवर नियंत्रण आणण्याकरिता तीनही गेटवर बूम बॅरियर यंत्रणा बसविण्यासाठी व त्या अनुषंगाने महाराष्ट्र सरकारची महा इ- वेबसाईट, मराठी व इंग्रजी वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देण्यासाठी व्यवस्थापन परिषदेत मान्यता देण्यात आली.<br>तसेच अनधिकृत वाहनांना विद्यापीठात प्रवेश देण्यात येऊ नये, परंतु विद्यापीठ क्षेत्राशी निगडित प्राध्यापक, प्राचार्य, शिक्षक, अभ्यागत व विद्यार्थी यांची गैर सोय होणार नाही याचीही काळजी घ्यावी. नियमित येणारे वाहनाना स्टिकर्स देण्यात यावे. मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव यांच्या कडे येणारे सर्व अभ्यागतांची नोंद करून घेणे. दुचाकी वाहनाच्या देखील नोंदी घेण्यात याव्या. RTO चे नियम पाळावे. स्पीड लिमिट पाळावी. विद्यापीठाशी संबंधित सर्व वाहनांना स्टिकर्स लावण्यात यावे. मा. कुलगुरूंच्या वाहनास देखील स्टिकर्स लावण्यात यावे. हेल्मेट संबंधी नियम देखील पाळावा. या सर्व नियमांचा अहवाल एक महिन्याच्या आत सादर करावा. तसेच वाहतुकीबाबतचे सर्व नियम फोर्ट, कालिना,रत्नागिरी, कल्याण व ठाणे सब सेंटर साठी बाध्य राहतील. रात्रीच्या वेळी वसतिगृहात प्रवेश करण्याची वेळ निश्चित करण्यात यावी.<br>बेवारस वाहनांची दखल घेण्यात यावी. सदर बेवारस वाहने घेऊन जाण्याची नोटीस वर्तमान पत्रात व वेबसाईट वर बातमी द्यावी. प्रतिसाद न आल्यास, सदर वाहनांबाबत आर.टी.ओ./ पोलीस यांना कळविण्यात यावे. अनुपयोगी वाहन, बाद झालेली वाहने यांची बाद करण्याची प्रकिया पूर्ण करावी. | |
| ११ | मुंबई विद्यापीठाच्या कनिष्ठ टंकलिपीक पदावरून कनिष्ठ ग्रन्थालय सहायक (सरळसेवा), वरिष्ठ लिपिक पदावरून अभिलेख सहायक (सरळ सेवा) पदावर आणि कनिष्ठ टंकलिपीक / स्वागतिक पदावरून कनिष्ठ लघुलेखक (सरळसेवा) या पदावर तात्पुरती नियुक्ती दिलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा संदर्भात ठोस निर्णय घेण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषेदेच्या विचारार्थ सादर | HRDC |
| ठराव | सदर बाब पुढील व्यवस्थापन परिषदे समोर ठेवण्यात यावी असे ठरले. | |
| १२ | 1. To finalise the location of land above identified area for construction of Hostel in Mumbai University Campus for students of Scheduled Cast and Scheduled Tribe, through the Department of Social Justice and Tribal Development Department, Government of Maharashtra as per direction received from Raj Bhavan, dated 06th September, 2024. | IPEMD |

| | | |
|---|---|---|
| | 2. Appropriate directions from Management Council. | |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की याबाबत मा. प्र-कुलगुरूंच्या अधिक्षेतेखाली एक समिती गठीत केलेली आहे, सदर समिती या बाबतीत देखील निर्णय घेउन अहवाल पुढील व्यवस्थापन परिषदे समोर द्यावा. | |
| On table item | | |
| १३ | मुंबई विद्यापीठाने ज्ञानोदय महाविद्यालयांस लावलेला पूर्ण दंड भरलेला नाही, परंतु त्यांनी काही दंड रक्कम विद्यापीठात जमा केली आहे. आणि त्यांनी बी.एम.एस. सत्र- ५ चा निकाल जाहीर करण्याची विनंती केली आहे. तरी सादर बाब विचारार्थ व मान्यतेस्तव सादर. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव | याबाबत असा निर्णय घेण्यात आला की ज्ञानोदय महाविद्यालयांस ज्ञानोद्य महाविद्यालयांचा बी.एम.एस. सत्र-५ चा निकाल जाहीर करण्यात यावा. तसेच व्यवस्थापन परिषदेच्या सूचनांनुसार सदर बाब अधिक माहितीसह पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावी. सदर बाब आजच्या बैठकीत मान्य करण्यात आली. | |

"मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना" बाबत माहिती देताना मा. कुलगुरूंनी सभागृहास अवगत केले की, या योजने अंतर्गत मुंबई विद्यापीठाच्या एकूण ८६ विद्यार्थाना प्रशिक्षणाची (Apprentiee) संधी उपलब्ध होणार आहे. मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागात प्रशिक्षणार्थी उमेदवाराची नियुक्ती करावयाची आहे. विद्यावेतन हे महाराष्ट्र शासनामार्फत DBT प्रणाली व्दारे दिले जाणार आहे.

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

कुलसचिव (प्र)

प्र- कुलगुरू

मा. कुलगुरू